जा.क्र. माध्य-२/५वी ते ७वी/मान्यता/पु
९५/
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे १ यांचे कार्यालय,
दिनांक :- 14 DEC 1995

प्रति,

शिक्षणाधिकारी [ माध्यमिक ]
जिल्हा परिषद, पुणे.

विषय:- इयत्ता ५ वी ते ७ वी चे वर्ग माध्यमिक शाळेस जोडणेस परवानगी देणेबाबत.

---

पंढरीनाथ मोहिते विद्यालय, गणेश पेठ, पुणे.

संदर्भ:- आपले पत्र क्र. शिक्षण/माध्य/ह-४/५वी/२५/दि. १८.१०.९५

उपरोक्त विषयाचे संदर्भिय प्रस्तावानुसार कळविण्यात येते की, पंढरीनाथ मोहिते विद्यालय, [इंग्लिश मिडीयम] गणेश पेठ, पुणे या शाळेच्या इयत्ता ५ वी ते ७ वी चे वर्ग माध्यमिक विभागात जोडणेस परवानगी देणे संदर्भात प्राथमिक विभागाकडील शिक्षक माध्यमिक विभागाकडे जाण्यास तयार असल्याचे प्रत्येकाचे स्वतंत्र संमतीपत्र सादर करावे.

तदनंतर प्रस्तुत प्रकरणी पुढील कार्यवाही केली जाईल.

मूळप्रतिवर शि. उ. सं. यांची
सही आहे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १.

प्रत,

मुख्याध्यापक,
पंढरीनाथ मोहिते विद्यालय,
इंग्लिश मिडीयम,
३१३ गणेश पेठ, पुणे २.

हाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे-४११०१०.

क्रमांक-पुविमं/शाखा डीपी/मान्यता/
पुणे-४११०१०
दिनांक : 20/7/95

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
पंढरीनाथ मोहिते इंग्रजी मेडियम हायस्कूल
३५३ गणेशपेठ, दूधभट्टीजवळ पुणे - ४११००२

विषय : माध्यमिक शाळेस मान्यता व सांकेतिक क्रमांक देण्याबाबत..
(नवीन सांकेतिक क्रमांक 11.६८४ सन १९९५ पासून)

महोदय/महोदया,

मंडळ नियमावली नियम क्रमांक २८(१) अन्वये आपण या मंडळाची प्रथम मान्यता मिळविण्यासाठी केलेल्या अर्जाच्या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, मार्च १९९५ मध्ये होणा-या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस विद्यार्थी पाठविण्याकरिता आपल्या माध्यमिक शाळेस शिक्षण खात्याने घातलेल्या अटी व त्याशिवाय खालील अटींवर 11.६८४ हा तात्पुरता सांकेतिक क्रमांक - ~~मराठी~~ / इंग्रजी / ~~उर्दू~~ या माध्यमासाठी सन १९९५ साठी देण्यात येत आहे. यापुढे या कार्यालयाशी पत्रव्यवहार करताना माध्यमिक शाळेचा वरील निर्धारित सांकेतिक क्रमांक असणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

१) माध्यमिक शाळा संहितेमधील नियम ३, २ (६, ७, ८) च्या तरतुदीनुसार सर्व अटी पूर्ण केलेल्या असल्या पाहिजेत.

२) प्रमाणानुसार पुरेशी विद्यार्थी संख्या आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ विनिमय १९७७ च्या क्रमांक २८(७) अन्वये सर्व अटी पूर्ण असल्या पाहिजेत.

३) मंडळाच्या परीक्षेच्या वेळी ज्या केंद्रावर आपल्या शाळेचे विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट होणार असतील, त्या केंद्रावर पुरेसे फर्निचर स्वखर्चाने पोचविण्याची जबाबदारी आपली राहील.

केंद्रावरील बैठक व्यवस्था किंवा फर्निचरसाठी आपले सहकार्य नसल्यास ही मान्यता पूर्वसूचना न देता विनियम २८(११) अन्वये रद्द केली जाईल.

४) मंडळाच्या परीक्षेसाठी ज्या ज्या वेळेस शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवेची आवश्यकता असेल, त्या त्या वेळी ती प्राधान्याने दिली पाहिजे. प्रचलित नियमानुसार परीक्षेचे काम हे आवश्यक व सक्तीचे असल्याने आवश्यक सेवकवर्ग उपलब्ध करुन दिला पाहिजे.